## प्रकरण तिसरे

# सरदार वल्लभभाई पटेल यांचे फाळणीसंबंधी विचार

# प्रकरण 3

# सरदार वल्लभभाई पटेल यांचे फाळणीसंबंधीचे विचार

**प्रस्तावना -**

श्रेष्ठ राजनितीज्ञ आणि आधुनिक भारताचा निर्माण लोहपुरुष सरदार वल्लभभई पटेल देशात असे व्यक्ती होऊन गेले की त्यांना जोपर्यंत देशाचे अस्तित्व आहे तोपर्यंत नेहमी लक्षात ठेवले जाईल. सरदार पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी सध्याच्या गुजरात राज्यातील करमसद खेडयात लेवा पाटीदार कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव झाबेरभाई व आईचे नाव लाडबाई होते. लाडबाई झाबेरभाईची दुसरी पत्नी होती. वल्लभभाई पटेल यांना सोमाभाई, नरसिंहभाई, विठ्ठलभाई आणि काशीभाई असे चार बंधू व डाहिखा नावाची एक बहीण होती. सरदार पटेल आपल्या आई-वडिलांचे चौथे अपत्य होते.

सरदार पटेलांचे घराणे पाटीदार जातीचे होते. हे लोक बऱ्याच वर्षापूर्वी गुजरातध्ये येऊन स्थायिक झाले होते. त्यांनी गुजरातमध्ये १२ गावे वसवली होती. यापैकी सहा गावे - नाडियाद, बसी, करमसद, भादरण, धर्मन आणि सोमित्रा मोठे आणि कुलीन मानले जात होते. पाटीदार लोकांमध्ये स्वाभिमानाची भावना ठासून भरलेली होती. काही विदेशी पर्यटकांनी त्यांच्या या वैशिष्टयाचा उल्लेख केला आहे.(१)

सरदार पटेलांचे प्राथमिक शिक्षण गुजराती माध्यमातील शाळेत पूर्ण केले. माध्यम्कि शिक्षणासाठी त्यांनी प्रथम नडियाद व तेथून शासकीय हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. १८९७ मध्ये त्यांनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांची इच्छा उच्च शिक्षण घेण्याची होती; परंतु घरच्या परिस्थितीमुळे त्यांनी जिल्हा वकिलाची परीक्षा उत्तीर्ण करुन गोधरा येथे वकिली व्यवसाय सुरु केला. त्यानंतर ते बोरसद येथे गेले. येथे त्यांचा वकिल म्हणून चांगला जम बसला होता. १९१० मध्ये त्यांनी लंडनमधील 'मिडल टेंपल' येथे बॅरिस्टरच्या

अभ्यासासाठी प्रवेश घेतला. १९१३ मध्ये बॅरिस्टरची परीक्षा चांगल्या श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर ते भारतात परत आले आणि अहमदाबाद येथे त्यांनी बॅरिस्टर म्हणून आपला व्यवसाय सुरू केला.

१९१७ मध्ये सरदार पटेलांनी आपला वकिली व्यवसाय सोडून गांधीजींचे सहकारी म्हणून राष्ट्रीय आंदोलनात भाग घेण्यास सुरुवात केली. याच काळात ते अहमदाबाद नगरपालिकेचे अध्यक्षही राहिले. या काळात त्यांनी केलेले समाजातील कार्य नोंद घेण्यासारखे आहे. १९२८ मध्ये सरदार पटेलांनी बारडोली सत्याग्रहाचे संचालन केले. या सत्याग्रहात त्यांनी गांधीजींच्या सत्याग्रहासंबंधीच्या सिध्दांतांना प्रत्यक्षात आणले. या सत्याग्रहाने सरदार पटेलांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये, उदा. दृढनिश्चय, योग्य व्यूहरचना, स्वतःला पूर्णपणे कार्यात झोकून देणे, शिस्त आणि नैतिकता इत्यादी प्रथमतःच देशाच्या समोर आली. बारडोली सत्याग्रहाचे यश हे सरदार पटेलांचे यश असल्यामुळेच त्यांना ‘सरदार’ ही पदवी देण्यात आली. या बारडोली सत्याग्रहाने सरदार पटेल यांची राष्ट्रीय नेत्यांत गणना होऊ लागली. सरदार पटेल यांनी गांधीजींनी सुरू केलेल्या मिठाचा सत्याग्रह आणि भारत छोडो आंदोलन यातही प्रत्यक्षपणे भाग घेतला. सरदार पटेल कॉँग्रेसमधील एक असे व्यक्ती होते की ज्यांनी अनेक सत्याग्रह सुरू करुन त्यात यश मिळविले होते.

१९३७ मध्ये जेव्हा कॉँग्रेसने सत्तेत भाग घेण्यास सुरूवात केली तेव्हा सरदार पटेल पार्लमेंटरी कमिटीचे अध्यक्ष झाले. या काळात त्यांनी पक्षाला मार्गदर्शन तर केलेच पण त्याचबरोबर कॉँग्रेस मंत्रीमंडळाच्या कामकाजावरही नियंत्रण ठेवले.

सप्टेंबर १९४६ मध्ये जेव्हा हंगामी सरकारची स्थापना झाली तेंव्हा सरदार पटेल यांच्याकडे गृहखात्याची तसेच माहिती आणि प्रसारण विभाग देण्यात आले होते. याच काळात कॉँग्रेसने मुस्लिम लीगने निर्माण केलेला सांप्रदायिकतेचा प्रश्न सोडविण्यासाठी देशाच्या विभाजनास मान्यता दिली होती.

या काळात सरदार पटेल यांनी सांप्रदायिक संघटनांसंबंधीचे व्यक्त केलेले विचार अतिशय महत्त्वाचे ठरतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्थापन झालेल्या मंत्रीमंडळात सरदार पटेल हे उपपंतप्रधान होते. तसेच त्यांच्याकडे राज्यासाठी निर्माण केलेला विशेष विभागही देण्यात आला होता. १९४७ च्या कायद्याने देशी राज्यांचा प्रश्न सोडविण्याचा कोणताही प्रयत्न केलेला नव्हता. त्यामुळे भारतासाठी स्थानिक संस्थानांचा प्रश्न सर्वात महत्त्वाचा व जटिल बनला होता. ज्या पध्दतीने सरदार पटेलांनी देशी राज्यांचा प्रश्न सोडविला ते प्रकरण भारताच्या इतिहासातील महत्त्वाचे प्रकरण बनले आहे. सरदार पटेलांच्या प्रयत्नांमुळे या स्थानिक संस्थानांचे भारतीय संघराज्यात एकीकरण आणि त्या राज्यामध्ये लोकशाहीकरण शक्य झाले.

सरदार पटेलांच्या या कार्याची तुलना काही लोक जर्मनीच्या बिस्मार्कशी करतात. परंतु सरदारांचे कार्य बिस्मार्कपेक्षाही मोठे वाटते, कारण सरदार पटेलांच्या मागे फार मोठी फौज नव्हती. सरदार पटेलांचे स्थानिक संस्थानांसंबंधीचे विचार व कार्य, त्यांची फाळणीविषयी भूमिका, यामधून त्यांचे अष्टपैलू आणि कार्य करण्याची पध्दती स्पष्ट होते. ते उत्तम संघटक, धाडसी व दृढनिश्चयी होते, म्हणूनच त्यांचा उल्लेख 'Iron Man' - लोहपुरुष असा करतात.

**सरदार पटेलांचा राजकीय सहभाग -**

सरदार पटेल यांनी दीर्घ काळ काँग्रेस संघटनेचे नेतृत्व केले. महात्मा गांधी व पंडित नेहरु यांच्या पाठोपाठ भारतीय राजकारणात सरदार वल्लभभाई पटेलांनी मोलाची कामगिरी नि:संशय बजावली. फाळणीच्या चर्चेत त्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला होता. त्यांच्यावर हा ही आरोप आहे की, फाळणीला त्यांनीच सर्वप्रथम मान्यता दिली. परंतु सरदार पटेल यांनी सतत जीना यांच्या मागणीला विरोध केला.

सरदार पटेलांनी आयुष्यभर भारत एकसंघ राहावा यादृष्टीने काम केले. फाळणी ही मूलतः चूक आहे, हे ते शेवटपर्यंत विसरु शकेले नाहीत. वास्तवता त्यामुळे उध्वस्त होईल असे त्यांना वाटे. "तुम्ही समुद्र किंवा नदीचे पाणी दुभंगू शकत नाही. मुस्लिमांच्या संदर्भात बोलायचे झाले तर येथे त्यांची मुळे आहेत. पवित्र तीर्थस्थाने आहेत आणि प्रमुख सांस्कृतिक केंद्रे आहेत. पाकिस्तान जाऊन त्यांना काय करता येईल, हे मला ठाऊक नाही" (२) असे सरदार पटेलांचे मत असल्याचे दिसून येते.

सरदार पटेल हे जाणून होते की, धर्माच्या आधारावर देशाचे विभाजन विनाशकारी ठरेल. परंतु इतिहासाची विटंबना आहे की ज्या प्रमुख नेत्यांनी विभाजनाची योजना स्वीकारली त्यात सरदार पटेलही होते.

१९३४ मध्ये दुसऱ्या महायुध्दाला सुरुवात झाली आणि काँग्रेस मंत्रीमंडळाने त्यांच्या परवानगीशिवाय ब्रिटनकडून या महायुध्दात भाग घेण्याची घोषणा केल्याच्या निषेधार्थ त्यांनी राजीनामा दिला. ही संधी जीना आणि मुस्लिम लीग यांना आपल्या फाळणीच्या मागणीसाठी साहाय्यभूत ठरली. १९२९ मध्ये जिथे लाहोरला पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली २६ जानेवारीला संपूर्ण स्वराज्यप्राप्तीची घोषणा केली गेली. तेथेच ठीक ११ वर्षांनी मुस्लिम लीगद्वारे महम्मद अली जीना यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र पाकिस्तानच्या मागणीचा ठराव संमत झाला. येथे हे ही उल्लेखनीय आहे की, मुस्लिम लीग काँग्रेसशी कोणत्याही बाबतीत किंचितही सहमत झाली नाही. एखादा मुद्दा हिताचा असला तरी त्याचा विरोधच केला जात होता.

१९४० च्या प्रस्तावित व्यक्तिगत सत्याग्रहानंतर १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनाचा लीगने पूर्ण विरोध केला आणि संपूर्ण देशातील मुसलमानानाही याचा विरोध करण्यास सांगितले. येथे हे ही स्पष्ट करणे आवश्यक आहे की, यावेळी दुसरे महायुध्द सुरु होते. काँग्रेस सरकारचा विरोध करत होती. त्यामुहे तिच्यावर दडपण आणले जात होते. परंतु लीगला मात्र प्रोत्साहन दिले जात होते. ज्यायोगे काँग्रेसच्या कार्यक्रमांना लीग विरोध करुन त्यांना दुर्बल

करेल. लीगही वेगवेगळया प्रलोभनाला बळी पडून काँग्रेसच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गात अडचणी निर्माण करत होती.

महात्मा गांधी हे मुस्लिम लीग व बॅ. जीना यांना सतत मदतीचा हात देत होते. परंतु जीनांची दृष्टी मात्र पूर्णतः सांप्रदायिक होती, वास्तविकता अशी आहे की, महात्मा गांधी जीनाबद्दल आवश्यकतेपेक्षा जास्त सहानुभूती आणि त्यांना दिला जाणारा सन्मान हे ही विभाजनाच्या कारणांपैकी एक कारण ठरले. जीनांच्या मनातील गांधीविषयीच्या भावनांचे दर्शन त्यांनी जून १९४२ मध्ये लुई फिशर यांना लिहिलेल्या पत्रात स्पष्ट दिसते, होमरूल सोसायटीच्या दिवसांत काँग्रेसमध्ये नेहरुंनी माझ्याअंतर्गत कार्य केले. गांधीनीही माझ्याच अंतर्गत कार्य केले.(३) यावरून जीनांच्या मनातील गांधींच्याविषयीचा आदर समजून येतो.

जे महात्मा जीनाना कायदेपंडित म्हणत होते तो जीना त्यांना गाधी म्हणतो. एवढेच नव्हते तर जीनांनी याच पत्रात महात्मा गांधींना हिंदू-मुस्लिम एकतेचे शत्रू ठरवून पुढे लिहिले, “मी काँग्रेस पक्षात सक्रिय होतो आणि माझा उद्देश हिंदू-मुस्लिम एकता हा होता. गांधीजींना मात्र हे नको होते त्यामुळे मी नाराज झालो.” (४)

गांधीजींच्या पत्रामध्ये जर जीनांचे नांव बघितले तर त्यांनी त्याचा उल्लेख नेहमीच प्रिय भाई असा केला आहे. यावरुन गांधीजींच्या मनात असलेला जीनांबद्दलचा आदर व्यक्त होतो. सरदार साहेबांच्या मनात ही स्पष्ट धारणा होती की, लीग आणि जीनांना आवश्यकतेपेक्षा जास्त प्रोत्साहन देऊ नये. त्यांना गांधीजींची ही गोष्ट पसंत नव्हती. १९४२ च्या “छोडो भारत” आंदोलनानंतर जेव्हा सरदारांना अटक झाली होती. तेव्हा खूप वेळा त्यांनी पत्राद्वारे लीग आणि जींना यांच्या खुशामतीविरुध्द इशारा दिला होता. त्यांनी मौलाना आझादांवरही काँग्रेसच्या नात्याने लीगबद्दलच्या सहानुभूतीबद्दल अप्रत्यक्ष टीका केली होती. जर सरदारांच्या या सल्लायुक्त इशाऱ्यांना गांभिर्याने घेतले

गेले असते तर जीना व लीग याची खुशामत थांबली असती आणि विभाजनात जीनांनी जे दावे सादर केले ते सादर झाले नसते. (५)

१९४५ मध्ये दुसरे महायुध्द संपले आणि ब्रिटनची जर्जर आर्थिक आणि राजकीय व्यवस्था, अनेक देशाचे दबाव, भारतीय लोकांमध्ये निर्माण झालेली चेतना यामुळे गृहयुध्दाची आशंका निर्माण झाली. त्याचप्रमाणे १९४६ च्या प्रारंभी भारतीय नौसेनेत झालेला विद्रोह, ब्रिटनमध्ये मजूर गटाच्या लॉर्ड एटलीद्वारे सरकारची स्थापना - याप्रकारच्या सगळया इंग्रज सरकारने भारतातून पलायन करण्याचा आपला विचार पक्का केला. परिणामस्वरुप २३ मार्च १९४६ ला लॉर्ड लॉरेन्स, लॉर्ड अलेक्झांडार आणि सर स्टेफोर्ड क्रिप्स या तीन वरिष्ठ मंत्र्यांबरोबर कॅबिनेट मिशन आले. ज्याचा मुख्य उद्देश होता भारतातील राजकीय व्यवस्थेबद्दल योग्य निर्णय घेणे. परंतु ही कॅबिनेट मिशन योजना कोणत्याही परिस्थितीत विभाजनाच्या विरोधात होती.

कॅबिनेट मिशनचे सदस्य भारतात आल्याबरोबर त्यांनी प्रथम महात्मा गांधींची भेट घेतली. त्यानंतर काँग्रेस कार्य समितीने, कॅबिनेट मिशन तसेच मुस्लिम लीगच्या प्रतिनिधींशी सिमला येथे चर्चा करण्याचे कार्य काँग्रेस अध्यक्ष मौलाना आझाद, पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल व खान अब्दुल गफारखान यांच्यावर सोपविले. ही चर्चा सिमलामध्ये ५ मे १९४६ ला सुरु केली. परंतु ती असफल होते असे दिसताच कॅबिनेट मिशन दिल्ली येथे आली. कॅबिनेट मिशनच्या तीन मंत्र्यांनी २३ मार्च ते १६ मे पर्यंत म्हणजेच जवळपास ५० दिवसांपर्यंत वेगवेगळया नेत्यांच्या भेटी घेतल्या. त्यांची अशी इच्छा होती की, भारतीय नेत्यांनी आपआपसात निर्णय घ्यावा, परंतु शेवटपर्यंत काहीही निर्णय न घेतला गेल्यामुळे मिशनने खालील प्रस्ताव मांडले.(६)

१) ब्रिटीश, भारत तसेच देशातल्या राज्याचा मिळून एक भारतीय संघ निर्माण केला जावा. ज्याच्या हाती परदेशी संबंध संरक्षण तसेच दळणवळणाची साधने असतील, या विभागाचा खर्च भागवण्यासाठी कर आकारण्याचा अधिकार असेल.

२) संघांची एक कार्यकारिणी असावी ज्यात ब्रिटीश, भारत आणि राज्य याचे प्रतिनिधी असतील.

३) बाकी सगळे विषय प्रांतीय विषय असतील.

४) प्रांतांना आपल्या गटाचा वर्ग तयार करण्याचा अधिकार असेल, त्यांची इच्छा असेल तर ते आपल्या वर्गाचे सरकार बनवू शकतात.

५) दहा वर्षानंतर यावर पुनर्विचार केला जाईल.

६) संविधान परिषदेची निवड संघ कार्यकारिणीचे नवनिर्वाचित सदस्य अशाप्रकारे करतील की संविधाने परिषदेत दहा लाख जनसंख्येचा एक प्रतिनिधी असेल. प्रत्येक धर्मातील संप्रदायातील लोक आपल्याच धर्मातून सदस्याची निवड करतील.

७) या प्रस्तावासाठी केवळ, हिंदू-मुसलमान आणि शीख असे फक्त तीनच धर्म स्वीकारले जातील.

८) भौतिक अधिकार, अल्पसंख्यांक, आदिवासी क्षेत्रांच्या संबंधात वेगवेगळया उपसमित्या विचार करतील, आणि,

९) केंद्रात ताबडतोब एका अस्थायी सरकारची स्थापना केली जाईल.

जीनांनी ही योजना स्वीकारली. त्यांचा उद्देश असा होता की, कॉंग्रेसने याचा विरोध करावा. या बरोबरच त्यांना असेही वाटत होते की, विभाजनाचा कोणताही प्रस्ताव या योजनेत नव्हता. म्हणूनच जेव्हा ही योजना स्वीकारली जाणार नाही तेव्हा आपोआप सारी सुत्रे आपल्या हातात येतील. ज्याचा उपयोग ते उद्देश उपलब्धीसाठी करु शकतील. सरदार पटेलांना जीनांची वृत्ती माहित होती. त्यांना कॉंग्रेसमध्ये कोणीच समजू शकले नाही, म्हणून त्यांनी या घटनेनंतर चर्चेत हिरीरीने भाग घ्यायला सुरुवात केली. त्यांच्या चर्चेचा परिणाम म्हणून कॉंग्रेसने ही योजना स्वीकारली. परंतु कार्यसमितीने अस्थायी सरकारचा प्रस्ताव अमान्य करुन संविधान सभेचाच प्रस्ताव स्वीकारला. मुस्लीम लीगने योजना स्वीकारली होती आणि सरकार स्थापनेची परवानगी मागितली. परंतु

व्हाईसरॉयने एकटया मुस्लिम लीगवर ही जबाबदारी सोपविण्यास स्पष्ट नकार दिला.

१२ ऑगस्ट १९४६ ला पुन्हा व्हाईसरॉयनी कॉंग्रेस अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरु यांना सरकार स्थापनेसाठी आमंत्रित केले. तसेच कॉंग्रेस महासनितीनेही त्यांना आमंत्रण स्वीकारण्याचा अधिकार दिला. पंडित नेहरुंनी कार्यसमितीच्या बैठकीनंतर जीना यांची भेट घेऊन त्यांना अस्थायी राष्ट्रीय सरकारमध्ये सामील होण्याचे आमंत्रण दिले. मात्र या आमंत्रणाला जीना यांच्याकडून अटी घातल्या जाऊ लागल्या. म्हणून २ सप्टेंबरला नेहरुंनी लीगशिवाय मंत्रीमंडळाची स्थापना केली. सरदार पटेल यांना गृहमंत्रीपद दिले गेले. आता लीगला जाणीव झाली की, संधी हातून निसटून गेली आहे, म्हणून तिने कॉंग्रेसबरोबर सत्तेत सामील होऊन आपले ध्येय साध्य करण्याची वृत्ती अवलंबली. हे तर स्पष्टच होते की, लीग देश विभाजनासाठीच सत्तेत सामील झाली होती याची सत्यता दरम्यानच्या काळात झालेल्या सांप्रदायिक दंगलीवरुन दिसून येते.(७)

१९ ऑक्टोबर १९४६ ला लीगचे एक सदस्य गजनफर अली खान यांनी लाहोर येथे दिलेल्या भाषणावरुन तर हे आणखीनच स्पष्ट होते. या संदर्भात सरदार पटेल यांनी मौलानांना पत्रात विवरण देताना लिहिले, केंद्रातील अंतरिम सरकारचे मुस्लिम लीगचे सदस्य गजनफर अली खान हे लाहोर इथल्या इस्लामिया कॉलेजच्या विद्यार्थीनींसमोर भाषण देताना म्हणाले की, "आम्ही अंतरिम सरकारमध्ये यासाठी जात आहोत की, आमचे लक्ष्य पाकिस्तानच्या संघर्षासाठी आधार सापडावा आणि मी तुम्हाला खात्री देतो की, आम्ही पाकिस्तान मिळाल्याशिवाय थांबणार नाही. केंद्रात कॉंग्रेस सरकारच्या स्थापनेनंतर देशाच्या अनेक भागांमध्ये जे उपद्रव आणि जातीय दंगली झाल्या त्यावरुन हे निःसंदेह सिध्द होते की, भारतातले दहा कोटी मुसलमान अशा कोणत्याही सरकारसमोर झुकणार नाहीत ज्यात त्यांचे खरे प्रतिनिधी नाहीत. कोणतीही सत्ता मुस्लिम राष्ट्राच्या स्वातंत्र्य लहरीला रोखू शकत नाही. ही

गोष्ट काँग्रेसला जेवढया लवकर समजेल तेवढं चांगलं आहे. आम्ही पाकिस्तानच्या अंतिम ध्येयावर अचल उभे आहोत आणि मी तुम्हाला खात्री देतो की, कायदेपंडित जीनाच्या नेतृत्वात आम्ही आमचं ध्येय जरुर साध्य करु."(८) यावरुन मुस्लिम लीग या सरकारमध्ये सामील होण्याचा कुटील डाव लक्षात येतो.

मुस्लिम लीग सरकारमध्ये सामील झाल्यावर पहिला प्रश्न आला विभागांच्या वाटपाचा. लॉर्ड वेव्हेल यांचा सल्ला होता की, एक महत्त्वाचा विभाग लीगच्या प्रतिनिधींना मिळायला हवा. त्यांना असे वाटत होते की, काँग्रेसने गृहविभाग लीगला सोपवावा. गृहखाते त्यावेळी सरदार पटेलांकडे होते. त्यांनी हे खाते सोडण्यास नकार दिला, हा नकार प्रतिष्ठेमुळे नव्हता तर लीगच्या धोरणांमुळे आणि विभाजनाच्या ठाम निश्चयामुळे होता. त्यांना ही पुरेपूर खात्री होती की मुस्लिम लीग या पदाचा दुरुपयोग सांप्रदायिक भावनेसह पाकिस्तानच्या निर्मितीत करेल, ज्यामुळे देशाचे अस्तित्वच धोक्यात येईल. देशात पुन्हा हिंसा घडू नये म्हणून त्यांनी परखड शब्दांत सांगितले की, मी सत्तेतून बाहेर पडेन, पण गृह विभाग सोडणार नाही.(९)

अंतरिम सरकारमध्ये लीग सामील झाली आणि वित्त विभाग लीग प्रतिनिधींच्या रुपात श्री. लियाकत अली खान यांच्याकडे सोपविला गेला. परंतु काही वरिष्ठ मुस्लिम अधिकाऱ्यांच्या सहकार्याने सरकारच्या सगळया विभागांमध्ये अडथळे निर्माण करुन त्याचा दुरुपयोग केला. याचा प्रमुख शिकार गृहविभाग झाला, जो की सरदार पटेलांकडे होता. लियाकत अली यांनी प्रत्येक सरकारी प्रस्ताव जो वित्त विभागाकडे जात होता त्याचे स्वरुपच बिघडवले आणि हे सिध्द केले की, मुस्लिम लीग काँग्रेसला संयुक्त भारतात कोणत्याही परिस्थितीत सहकार्य करणार नाही. कारण तिचे ध्येय पाकिस्तानची निर्मिती हे आहे. दुसरी गोष्ट म्हणजे अंतरिम सरकारच्या निर्मितीच्या वेळेस असे ठरले होते की, मंत्रीमंडळाची अधिकृत बैठक होण्याआधी सगळया सदस्यांनी आपसांत भेट घ्यावी. यामागे असा विचार होता की, जर सदस्यांमध्ये

आपसात चर्चा झाली तर व्हाईसरॉय केवळ घटनात्मक राहील, हा निर्णय घेण्यास मदत मिळेल. परंतु लियाकत अली म्हणाले की, "मी ही गोष्ट मान्य करीत नाहीत की, कार्य परिषदेचे उपाध्यक्ष या नात्याने जवाहरलाल नेहरु यांना कोणत्याही प्रकारची कार्य परिषदेची बैठक बोलाविण्याचा अधिकार आहे." ही गोष्ट मुस्लिम समाजाच्या उच्च वर्गाची भावना पुन्हा स्पष्ट करते. कारण बहुसंख्य समाजाच्या कोणत्याही नेतृत्वाकडे लीगमधील उच्चवर्गीय समाज भयपूर्ण दृष्टीने बघत असे.(१०)

कॅबिनेट मिशन योजनेंतर्गत निर्माण झालेल्या घटनात्मक सभेवरही मुस्लिम लीगने बहिष्कार घातला. या बरोबरच देशात वाढणाऱ्या धार्मिक दंगलींनीही देशाला विभाजनांच्या दारापाशी नेऊन उभे केले.

**जातीय दंगली -**

जेव्हा कॉंग्रेसने नेहरुंच्या अध्यक्षतेखाली सरकारची स्थापना केली आणि लीग त्यातून बाहेर राहिली, त्यावेळी तिने आपला रोख धार्मिक दंगलींद्वारे व्यक्त केला. ज्या ठिकाणी लीग पाकिस्तानचा दावा करु इच्छित होती आणि जी राज्ये स्वतंत्र देशाच्या निर्मितीवर प्रभाव टाकणारी होती अशा राज्यांमध्ये धार्मिकता पराकोटीला पोहोचली. ही राज्ये होती बंगाल, बिहार, उत्तरप्रदेश, राजस्थानचा काही भाग, पंजाब तसेच उत्तर पश्चिमी सीमा प्रांत. स्वतः लीगने पाकिस्तानच्या निर्मितीसाठी अटळ कारवाईचे आव्हान दिले आणि ही कारवाई सुरु झाली. पूर्व बंगालपासून इथे मुख्यमंत्री सुहारवर्दी यांना शहीद अर्थात इस्लामसाठी प्राणार्पण करणारा म्हणून घोषित करण्यात आले. पूर्व बंगालमध्ये भयंकर रक्तपात झाला. श्री. फिरोज खान नून या एका व्यक्तिने म्हटले आहे की, "अशी स्थिती करण्यात येईल की, लीग चंगेज खान आणि हलाकू खानच्या हत्याकांडाला विसरुन जातील. कलकत्याचे हत्याकांड दिल्लीच्या नादीर शहा हत्याकांडानंतरचे सगळयात मोठे आणि भयंकर हत्याकांड होते. कलकत्याच्या नाल्यांमधूनच रक्त वाहू लागले. या दंगलीत जवळपास ४०००

लोक मारले गेले आणि हजारो जखमी झाले. कोटयावधी रुपयांची संपत्ती जाळली गेली अथवा लुटली गेली." (११)

याची प्रतिक्रिया इतर वर्गातही उमटली आणि दिल्ली, बिहारमध्ये याचा बदला घेतला गेला. परंतु पुन्हा पूर्व बंगालमध्ये नोआखली येथे दंगली झाल्या. जिथे स्वतः महात्मा गांधी शांततेच्या स्थापनेसाठी गेले होते. तिथे तर शांतता प्रस्थापित झाली परंतु मुझफरपूर, आग्रा, मुंबई, अलीगढ, सिलहर, कोटा, आरा बनारस, गोरखपूर, अलाहाबाद, गडमुक्तेश्वर, अहमदाबाद आणि ढाका येथे दंगली होतच राहिल्या. सरकारही मौन झाले होते.

वास्तविक या क्षेत्रामध्ये दंगलीची आशंका आधीपासूनच होती. सरदार पटेलही याचमुळे कॅबिनेट मिशनच्या सदस्यांना म्हणाले होते, "जर मुस्लिम लीगबरोबर समझोता झाला नाही तर बंगाल आणि सिंध प्रांतामध्ये धार्मिक उपद्रवाची दाट शक्यत आहे."(१२) यावर मिशनचे वरिष्ठ सदस्य सर स्टेफोर्ड क्रिप्स सरदारांना म्हणाले होते की, "तुम्ही बंगालची भीती बाळगू नका, कारण तिथे आमच्याकडे एक असे गव्हर्नर आहेत जे गंभीर उत्पादाची स्थिती निर्माण झाल्यास तात्काळ सेक्शन ९३ लागू करतील."(१३)

परंतु ज्यावेळी खरंच तशी परिस्थिती उद्‌भवली होती, त्यावेळी योग्य पाऊल उचलले गेले नाही. सरदार पटेलांच्या कडवट टीकेनुसार या साऱ्या भयंकर घटनांच्या वेळी बंगालचे गव्हर्नर दार्जिलिंग येथे आराम करत होते. पंजाबमध्ये लीगने एकत्रित प्रदर्शनाच्या माध्यमातून या कामाला सुरुवात केली. परंतु या सर्वांसमोर हार मानून मुख्यमंत्री खिजहयात खान यांनी राजीनामा दिला. श्री. एडवर्ड यांनी या भयंकर दंगलीबद्दल लिहिले की, "कडक कारवाईनंतर मार्चच्या शेवटपर्यंत शहरामध्ये थोडी शांतता आणि व्यवस्था निर्माण झाली, परंतु गावांमधून मात्र भीतीचे वातावरण होते. सरकारी आकडे दर्शवितात की, जवळपास दोन हजार लोकांनी या जातीय दंगलीत आपले प्राण गमावले; परंतु वास्तविक यापेक्षाही कितीतरी जास्त लोक मारले गेले असावेत.

मुस्लिम लीगने आपल्या प्रयत्नांनी पंजाबला गृहयुध्दाच्या उंबरठयावर आणून उभे केले."(१४)

पंजाब सरकारमध्ये महत्त्वाचे बहुसंख्य ब्रिटीश अधिकारी, इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमधील प्रत्येक व्यक्ती लीगच्या पाकिस्तानच्या मागणीबद्दल सहानुभूती दर्शवित होता. सरकारने याबाबत मोठी चिंता प्रकट केली आणि गजनफर अली खानच्या वक्तव्यावर तत्कालीन व्हाईसरॉय वेव्हेल यांचे लक्ष केंद्रीत केले. गजनफर अली खान असे म्हणाले, "खुदाची इच्छा असेल तर काही लाखच काय, करोडो लोकांना हरवून त्यांच्यावर हल्ला करु." (१५) या वक्तव्यावर ते मोठया प्रमाणात जातीयवाद पसरवत होते. गजनफर अलींनी यासंदर्भात मुहम्मद बिन कासिम तसेच महंमद गझनीच्या वीरतेचा उल्लेख केला.

यावर सरदार पटेलांनी टीका केली व व्हाईसरॉयला लिहिले, "ही तुलना महत्त्वपूर्ण आहे. विशेषत: महमंद गझन यांच्या आक्रमणाची त्यांनी भारतावर पुन्हा पुन्हा आक्रमण केले होते, ज्यात हजारो लोक मारले गेले होते." (१६)

सरदारांना असे वाटत होते की, पंजाबमध्ये विशेषत: ग्रामीण भागामध्ये ज्या हत्या होत आहेत आणि इतर जे अत्याचार होत आहेत, त्याकडे गांभिर्याने लक्ष द्यायला हवे. शेवटी त्यांनी असे सुचविले की, किमान काही भागांमध्ये तरी मार्शल लॉ लागू केला जावा, परंतु लॉर्ड वेव्हेल एवढी कठोर पावले उचलण्यास तयार नव्हते.(१७) देशाची फाळणी होईपर्यंत या दंगली सुरुच होत्या. दहशतीची बीजरुपी भावना स्वतंत्रपणाची, विभाजनाची मागणी करत होते. सरदारांच्या हे लक्षात आले होते की, ज्या प्रकारे जातीयवाद देशात निर्माण झाला आहे, त्याचे दोन परिणाम होऊ शकतात. स्वातंत्र्यप्राप्तीत अडथळा आणि देशात गृहयुध्द विशेषत: जेव्हा जातीयवाद या टोकाला पोहोचतो तेव्हा त्यापासूनच सुटका होणेही अशक्य आहे. जरी भारत एक असता तरी जी वातावरण निर्मिती झाली आहे, ती झालीच असती. सरदार पटेल मुस्लीम लीगच्या या जातीयवादी धोरणाशी पूर्णपर्ण परिचित होते.

लीगबद्दल त्यांचा विशेष दृष्टिकोनही बनला होता. यांच्यावर नजर टाकणे योग्य ठरेल.

## मुस्लीम लीगबद्दलचा दृष्टिकोन -

मुस्लीम लीगचा जन्म उच्चवर्णिय मुस्लिमांच्या दहशतवादी विचारांचा परिणाम आहे. हा परिणाम १९४० मध्ये लाहोरला स्वतंत्र राष्ट्राच्या मागणीपर्यंत येऊन पोहोचला आहे. या वेळेपर्यंत मुस्लीम लीगबद्दल सरदार पटेलांचा विशेष दृष्टिकोन तयार झाला नव्हता. ते या गटाला काही लोकांच्या जातीयवादी पार्टीच्या नजरेने पाहत होते. जी पूर्ण मुस्लिम समुदायाचे नेतृत्व करत नव्हती आणि जिचा उद्देशही पूर्ण होऊ शकणारा नव्हता. परंतु त्यानंतरच्या घटनांनी मात्र त्यांचे विचार बदलत गेले. त्यांचे धोरण लीगला आणि तिच्या नेत्यांना विशेष महत्त्व न देण्याचे असे होते. २८ डिसेंबर १९४५ ला सरदारांनी महात्मा गांधींना एका पत्रात लिहिले होते, "संयुक्त अधिवेशनानंतर आणि त्यानंतरच्या जीनांच्या अभद्र व्यवहारामुळे आम्हाला आणि काँग्रेसला त्यांच्याशी चर्चा करणे पसंत नाही आणि सत्य असे आहे की, कोणत्याही प्रकारे आपापसात शांतता निर्माण करण्याची त्यांची इच्छा नाही."(१८) परंतु यानंतरही लीगशी चर्चा होतच राहिली आणि तिची ताकद वाढतच गेली. १९४६ च्या सुरुवातीला तिने वेगवेगळया क्लुप्त्यांचा प्रयोग केला. यामुळे सरदारांना याची जाणीव झाली की, आता एकत्र राहणे अशक्य आहे. याविषयी त्यांनी बंगालमधील एका सहकाऱ्याला पत्रात लिहिले, "माझ्या मते मुस्लिम लीग वा त्यातला कोणताही गट जातीयवादी प्रश्नाचे योग्य समाधान करण्याच्या स्थितीत नाही. आम्ही लीगच्या विधानसभेतील व्यवहार पाहिला आहे. जिथे तिचे वर्तन समस्या निर्माण करणारे होते."(१९)

काँग्रेस सरकार आल्यानंतर लीगने जे काही केले त्यामुळे सरदार पूर्णतः दु:खी झाले. त्यांनी हे पाहिले की, बिहारमध्ये दंगलीनंतर शांतता प्रस्थापित झाली. तरीही लीगने दंगलखोरांना तिथेच थांबवून घेतले होते. अलिगढ इत्यादी ठिकाणांहून मोठया संख्येने लोक दोन धर्मामध्ये शांतता नांदू न

देण्यासाठी पंजाब आणि सीमा प्रांतात आणले गेले. तेंव्हाच सरदारांना सत्याची पूर्ण जाणीव झाली. त्यांना याची पूर्ण जाणीव झाली होती की, लीगने जी अवघड परिस्थिती निर्माण केली आहे, ती देशाला गृहयुध्दाच्या मार्गावरच घेऊन जात आहे. ज्यायोगे या शक्तींद्वारे लीग उद्देशपूर्ती करु शकणार होती. म्हणूनच ते लीगला अखंडतेचे शत्रू मानत होते.(२०)

वास्तविक सरदार देशाच्या अखंडतेची सदैव कामना करत होते. लोकशाहीच्या रुपात सशक्त भारत निर्माण करु इच्छित होते आणि या मार्गात जो अडसर येईल त्याला शत्रू समजत होते. स्पष्ट शब्दात त्यांच्यावर टीका करत होते. मत तो मुस्लिम लीगचा असो वा इतर कोणीही. याबाबतीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दलही त्यांना तक्रार होती. परंतु ते कोणत्याही दलाचा वा जातीचा खऱ्या धार्मिक आधारावर विरोध करत नव्हते. श्री. रावजीभाईंच्या शब्दात, "ते मनातील गोष्ट लपवत नव्हते. स्पष्ट शब्दामध्ये ते मुसलमानांना सांगत होते की, भारताचे नागरिक म्हणून हिंदू-मुसलमान दोघेही समान आहेत. म्हणूनच जर मुसलमान भारताला आपली मातृभूमी मानून इथल्या दुसऱ्या प्रजेशी प्रेमाने राहिला. हिंदूंशी बंधूभावाच्या नात्याने वागला, सुख-दुःखात सहभागी होऊन सहकार्याने भारताशी एकनिष्ठ राहिला तर कोणालाही त्यांच्याबद्दल शंका येणार नाही, परंतु ज्या मुसलमानांना भारतीय नागरिकांच्या रुपात संरक्षण प्राप्त करुन पाकिस्तानशी एकनिष्ठ राहायचे असेल त्यांनी जरुर पाकिस्तानात जावे. भारतीय नागरिक होऊन पाकिस्तानबद्दल आसक्ती बाळगणाऱ्या मुसलमानांचा ते तिरस्कार करीत. आपल्या या तिरस्काराला ते कधी लपवत नव्हते."(२१)

थोडक्यात सरदार पटेल मुस्लिम लीगकडे देशाच्या एकतेत सहकार्य करणार असेल तर उदारपणे बघत होते. जेंव्हा लीगचा जातीयवादी दृष्टिकोन बदलण्याची काही चिन्हे दिसेनात तेव्हा सरदार पटेलांची खात्री पटली की, लीग देशाचा शत्रू आहे आणि लीग देशाचे विभाजन करणारच. ही परिस्थिती आणखी बिकट होण्यापेक्षा त्यातून काही तरी मार्ग काढणेच उत्तम.

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दलचा दृष्टिकोन -

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ देशाच्या अखंडतेबद्दल बोलत होता आणि त्यांची संघटनाही मोठी होती. परंतु त्यांची संकुचित वृत्ती सरदारांना पसंत नव्हती. कारण त्यामुळे देशाचे नुकसान होते. या बरोबरच धर्माच्या नावावर असे काम करणे की, ज्यामुळे दोन धर्मामध्ये जिव्हाळयाचे संबंध निर्माण करणे कठीण जाईल, अशी कामे सरदारांना पसंत नव्हती. उदाहरणाबाबत मुस्लिम समाज गोमातेचा वध करुन मांस खातो आणि हिंदू याबद्दल राग व्यक्त करतात. याद्वारे दोन धर्मामधील संबंध, सद्भाव बिघडून जावा, हे सरदारांना पसंत नव्हते. स्वातंत्र्याच्या वेळी अशा प्रकारच्या घटनांबद्दल ते म्हणाले होते - सध्या काही लोक गोरक्षणाची गोष्ट करत होते. अजून तर लहान मुले स्त्रिया आणि वृध्दाचे रक्षण होत नाही तर गोमातेच्या रक्षणाचे काय? ज्या भागामध्ये गोहत्येवर बंदी नाही तिथे आज धष्टपुष्ट गायी आढळतात तशा येथे आढळत नाहीत. खरेच जर गोरक्षण करायचे असेल तर तिचे योग्य पालनपोषण करायला हवे."(२२)

सरदार पटेलांचा राष्ट्रीय स्वयंसेवकांच्या लाठी घेण्याला विरोध होता. त्यांच्या मते, राष्ट्रीय स्वयंसेवक दलातील लोक काहीसे दहशत निर्माण करतात. त्यांचा या गोष्टीला फार विरोध होता. त्यांना देशाच्या विकासात आणि एकतेत बाधक मानत होते. याच कारणामुळे ६ जानेवारी १९४८ ला लखनौ इथल्या सार्वजनिक सभेत सरदार म्हणाले होते, "आर. एस्. एस्. वाले आज ज्याप्रकारे काम करत आहेत त्या त्यांच्या चुकीच्या मार्गावरुन त्यांना योग्य मार्गावर आणले जावे. लाठीने काहीच काम होणार नाही. लाठी तर चोर डाकूंसाठी आहे."(२३)

सरदार पटेलांनी पुन्हा राष्ट्रीय संघाला अपील केले होते की, "मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला काँग्रेसमध्ये सामील होण्यासाठी निमंत्रित करत आहे आणि देशात अशांतता निर्माण करुन प्रशासनाला कमजोर न बनविण्याची विनंती करतो. मी म्हणतो, की त्यांनी व्यक्तिगत, वैयक्तिक हिताच्या दृष्टिने

काम करु नये. कारण परिस्थिती सरकारवर शांतता स्थापन करण्यासाठी सतत दबाव आणत आहे. ते हिंसेच्या मार्गाने प्रयोग करुन खरी सेवा करू शकत नाहीत."

अशाप्रकारे देशाच्या अखंडतेला तिळमात्रही धक्का लागावा हे त्यांना मान्य नव्हते म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची वृत्ती त्यांना मान्य नव्हती. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे बी. के. अहलुवालिया यांच्या शब्दात, "जरी सरदार पक्के हिंदू होते तरीही ते गृहमंत्री असताना त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घातली होती."(२४)

महात्मा गांधीच्या हत्येनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल जो रोष निर्माण झाला होता आणि महाराष्ट्रासहित उर्वरीत देशात जे हिंसेचे वातावरण निर्माण झाले होते त्या कारणामुळेच सरदारांच्या गृहमंत्रीपदाच्या कारकिर्दीत ४ जानेवारी १९४८ ला राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्यात आली होती आणि जेव्हा सरकारच्या असे लक्षात आले की, या संघाचे अनेक सदस्य हिंसाचार वाढविण्याचे आणि अन्य समाजविरोधी कार्य करत आहेत. तेंव्हा संघाला गैरवैधानिक घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्यांच्या २० हजार सदस्यांना एकदम अटक करण्यात आली.(२५) त्यांचे प्रमुख गोळवलकर यांनाही अटक झाली आणि संघावर लावण्यात आलेला प्रतिबंध बऱ्याच काळापर्यंत चालला. जेव्हा १९५० मध्ये संघाने शांतता स्थापण्यात मदत करण्याचे लेखी वचन दिले तेव्हाच ही बंदी उठवण्यात आली.

अशाप्रकारे दिसून येते की, सरदारांच्या नजरेत मुस्लिम लीग व राष्ट्रीय स्वयंसेवक दल हे दोन्ही समान आहेत. या दोन्ही संघटना धर्माला जास्त महत्त्व देत आहेत. त्यामुळे धार्मिक संघर्ष आणि फाळणीमुळे सरदारांना जबरदस्त धक्का पोहोचला. त्यांची सारी स्वप्ने धुळीस मिळाली. आजवर जोपासलेली एकात्मतेची कल्पना अखेरच्या घटका मोजू लागली. विलक्षण निराश मनःस्थितीत प्रत्येक जण पुढे येणाऱ्या घटनांना सामोरे जाण्यास सिध्द झाला. 'इंडिया विन्स फ्रिडम' या ग्रंथात लिहिताना मौलाना आझाद यांनी

लिहिले की, स्वाभिमान दुखावलेल्या आणि अपेक्षाभंग झालेल्या सरदारांनीही शेवटी फाळणीला मान्यता दर्शविली. त्या आधी त्यांनी जाहीर उद्गार काढले होते, लहान अगर मोठया कोणत्याही आकारातील पाकिस्तान नावाच्या सार्वभौम देशाचे अस्तित्व मी कदापि मान्य करणार नाही. या सर्व घडामोडीतून कदाचित यादवीलाही तोंड फुटल्यास काँग्रेसने त्या दृष्टिने सज्ज राहावे असेही त्यांनी सूचित केले.

जानेवारी १९४६ मध्ये ब्रिटीश संसदीय शिष्टमंडळाने भारताला भेट दिली. त्यांच्याशी बोलताना सरदारांनी स्पष्टपणे विचार मांडले. पाकिस्तान बहाल करणे हे ब्रिटीशांच्या हातात नाही. हिंदू आणि मुसलमानांना त्यासाठी लढा द्यावा लागेल. त्याबाबत यादवीच होईल. त्यानंतर मात्र सरदार पटेल सौम्य होऊ लागले. देशाचे दोन तुकडे करण्याची योजना माऊंटबॅटन यांनी ३ जून १९४७ रोजी तयार केली होती. ही योजनाच अधिक चांगली असल्याची खात्री सरदार पटेलांना पटवून देण्याची त्यांनी शर्थ चालविली. अखेर तो पोलादी पुरुष वाकला.

वास्तविक फाळणीच्या प्रस्तावाला काँग्रेस कार्यकारिणीमध्ये ते एकटे कडाडून विरोध करीत. इतर जण असाह्यपणाने त्यांचे अनुकरण करीत. या संदर्भात व्ही. शंकर लिहितात, "सरदार पटेलांनी सर्व परिस्थितीचा सारासार विचार केला. वस्तुस्थिती लक्षात घेतली. फाळणीची वाट मोकळी झाली. त्यांचे मत निर्णायक ठरले. पंडित नेहरुंना त्यांचा निर्णय मान्य करणे भाग पडले. अर्थात महात्माजींचीही त्याला मूक संमती होती."(२६)

खरे म्हणजे पटेल हे फाळणीचे कडवे विरोध होते. परंतु मौलाना आझाद तर त्यांना 'फाळणीचे जनक' म्हणू लागले. हे असे कसे घडले? या बाबातीत तत्कालीन कारण राजकीय नसून व्यक्तिगत असावे. चर्चा, वाटाघाटी, बैठका, परिषदा, तोडगा, करार आदी सर्व प्रकारांचा त्यांना अतिशय उबग आला होता. त्यातून संशय आणि विद्वेषाश्विाय अन्य काहीच निष्पन्न होत नव्हते. हंगामी सरकारमधील लीगच्या मंत्र्यांच्या वागणुकीमुळे ते कमालीचे त्रस्त झाले

होते. जाणूनबुजून केल्या जाणाऱ्या अशा वर्तनामुळे, अपमानामुळे ते संतप्त झाले. अनेकदा त्यांनी संबंध सुरळीत करण्याच्या दिशेन प्रयत्न करुन पाहिले. एकदा तर त्यांनी वेव्हेल यांना मध्यस्थी करण्याची सूचनाही, सरकारी यंत्रणेमार्फत देशाचे तुकडे करण्याच्या उद्योगासाठी जीना हे आपल्या मंत्र्यांना चिथावणी देत आहेत, अशी तक्रारही त्यांनी वेव्हेल यांच्याकडे केली. हंगामी सरकारला जात्यंध राजकारणाचे रणमैदान बनविण्याचा जीनांचा कोणताही प्रयत्न हाणून पाडला जाईल असे आश्वासून त्यांनी पटेलांना दिले.(२७) प्रत्यक्षात ते आश्वासन कुचकामी ठरेल. दंगलीच्या प्रकारात जास्तच वाढ झाली. लीगसमवेत जमवून घेण्याच्या दिशेने कोणतेही आशवादी चिन्ह दिसेनासे झाले.

सरदार पटेलांची फाळणीविषयी भूमिका स्पष्ट होती. फाळणी ही त्यावेळीच्या परिस्थितीचे अपत्य होते, असे मत सरदार पटेलांचे होते. सरदार पटेलांनी फाळणीसाठी निकराचा विरोध केला. तत्कालीन नेत्यांमध्ये कणखर भूमिका घेणारे ते पहिले नेते होते. परंतु त्यावेळच्या राजकीय गुंतागुंतीमुळे ते तसा निर्णय घेऊ शकले नाहीत. जीनांशी दोन हात करण्याच्या बाबतीत इतर नेत्यांमध्ये पटेल जास्त समर्थ होते. परंतु दुर्दैवाने या पोलादी पुरुषाला त्यावेळी काहीच करता आले नाही. मुस्लिम लीगच्या राजकारणाला हताश होऊन अखेर सरदार पटेलांनी फाळणीला मान्यता दिल्याचे दिसून येते.

**फाळणीच्या योजनेला मान्यता -**

आपल्या योजनेनुसार माऊंटबॅटन म्हणतात की, "अचानक निर्माण झालेली ही समस्या मी जाणू शकतो. जर आम्ही लवकर काम केले नाही, तर ही समस्या गृहयुध्दाचे स्वरुप धारण करील. यापेक्षा विभाजनाने फायदा होईल. याशिवाय मला भारताच्या एकतेचे स्वप्न साकार करण्याचा दुसरा कोणताच पर्याय दिसत नाही."(२८)

यासाठी त्यांनी बऱ्याचदा चर्चा केली. सरदारसाहेब त्यांच्याशी सहमत होते, कारण त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट होता. त्यांच्या मतानुसार - आम्ही हिंदुस्तानचे तुकडे होणे मान्य केले. खूप लोक असे विचारतात की आम्ही असे

का केले आणि ही आमची चूक होती. मला अजूनही मान्य नाही की आम्ही चूक केली नाही. उलट मला असे म्हणावयाचे आहे की, जर भारताचे तुकडे आम्ही मान्य केले नसते तर आजच्यापेक्षाही बिकट अवस्था निर्माण झाली असती आणि हिंदुस्तानचे दोन नाही तर अनेक तुकडे झाले असते. माझ्यासमोर अजूनही ते चित्र दिसतंय की, आम्ही कशाप्रकारे एक वर्ष सरकार चालविले आणि जर आम्ही हे मान्य केले नसते तर काय झाले असते? तुम्ही एवढा विश्वास ठेवा की, जर विभाजन करणे गरजेचे आहे आणि याशिवाय मुसलमान काहीच ऐकायला तयार नाहीत तर आम्ही त्यासाठीही तयार आहोत. कारण जो पर्यंत आम्ही परकीयांना दूर करत नाही तोपर्यंत दिवसेंदिवस अशी अवस्था निर्माण होईल की, आमच्या हातात भारताचे भविष्य राहणार नाही आणि परिस्थिती आटोक्याबाहेर जाईल म्हणून आम्ही असा विचार केला की, विभाजनाने परिस्थिती सुरळीत होणार असेल तर तसेच करावे. आम्ही हे मान्य केले की जर आपला भाऊ स्वतंत्र घर करुन सुखी होणार असेल तर त्याने आपले घर सांभाळावे. आम्ही आपले घर सांभाळू. परंतु आम्ही ही गोष्ट या आशेवर मान्य केली होती की, आम्ही हे कार्य शांततेने करु. यात आमचं काही चुकलं का? (२९)

वरील संदर्भानुसार सरदार पटेल तसेच पंडित जवाहरलाल नेहरुंनी सर्वप्रथम फाळणीला संमती दर्शविली. महात्माजी याला सहमत नव्हते, परंतु सरदारांनी त्यांना समजावले की, जेव्हा दोन भाऊ आपसात भांडतात तेव्हा स्वतंत्र घर करुन वेगळे होतात. तेव्हाच गांधीजींनी फाळणीला संमती दिली. जरी गांधीजींनी जीनांना पंतप्रधान होण्यास सांगितले, ज्यामुळे तरी भारत एकसंघ राहील परंतु तरीही जीना फाळणीच्या भूमिकेशी ठाम राहिल्याचे दिसून येते. निरनिराळया राज्यांची विभाजनाची प्रक्रिया तयार झाल्यानंतरही काँग्रेस महासमितीने आचार्य कृपालानी यांच्या अध्यक्षतेखाली १५ विरुध्द १५७ मतांनी आपल्या सभेत फाळणीला मान्यता दिली. फाळणीला विरोध करणारे मौलाना अबुल कलाम आझाद होते. त्यांनी आपल्या 'इंडिया विन्स फ्रिडम' या पुस्तकात

लिहिले आहे की, "बहुतेक शेवटच्या संधीपर्यंत जीनांसाठी पाकिस्तान सौदेबाजीचे एक साधन होते, परंतु पाकिस्तानासाठी लढा देण्यात हे बहुतेक मर्यादेबाहेर गेले होते." हे पूर्ण सत्य वाटत नाही, कारण फाळणीचे मुख्य कारण सौदेबाजीपेक्षा उच्चवर्गीय मुसलमानांमध्ये जी दहशत होती, तीच फाळणीचे मूळ कारण होती. त्यात एकानंतर एक कारणे जोडली गेली. स्वत: आझादांच्या पुस्तकातूनही हेच स्पष्ट होते जेव्हा दोन्ही पक्षांनी काँग्रेस आणि लीगने कॅबिनेट योजना स्वीकारली होती तर जीनांनी पुन्हा का नकार दिला? कारण नेहरुंनी असे वक्तव्य केले होते की, काँग्रेस बहुमताने जे आवश्यक असेल त्याचे नंतर संशोधन करेल. यामुळे जीना भयभीत झाले आणि वैतागून म्हणाले, आम्ही हे स्वीकारु शकत नाही. कारण संयुक्त भारतात बहुमताचाच दबदबा असेल, यावरुन पुन्हा दहशतीची आणि भीतीची भावना स्पष्ट होते.

सरदार पटेलांना फाळणीच्या घटनेमुळे अतिशय दु:ख झाले. त्यांच्याच शब्दांत सांगायचे झाले तर "मी आयुष्यभर भारताच्या एकतेसाठी प्रयत्नशील होतो. तुम्हा सगळयांना या प्रस्तावामुळे दु:ख झाले आहे, तेवढेच दु:ख मलाही झाले आहे. परंतु मी जे जाणले आहे की, हा प्रस्ताव स्वीकारावाच लागेल. त्याशिवाय काही पर्याय नाही. गेल्या नऊ महिन्यांपासून देशात शासन आम्ही चालवत आहोत. या कालावधीत मला वाईट अनुभवही आले. मी हे पाहिले आणि अनुभवलं, आम्ही हा प्रस्ताव स्वीकारला नाही तर गेल्या नऊ महिन्यांपासून ज्याप्रकारे राज्यकारभार सुरू आहे आणि ब्रिटीश शासनाने ज्याप्रमाणे हे सर्व सुरु ठेवले आहे त्यावरुन असे भय वाटते की, जर अशाच प्रकारे आणखी काही दिवस गेले तर भारताचाच पाकिस्तान होईल. म्हणून जर साऱ्या भारताचे पाकिस्तान होण्यापासून वाचवायचे असेल तर फाळणीचा स्वीकार करणे हे बुध्दिमत्तेचे लक्षण ठरेल. यात देशाचे हित नक्कीच आहे. भविष्यातील वाईट गोष्टी टाळण्यासाठीच एक दु:खद प्रसंग स्वीकारणे हे योग्यच. यामुळे मी दु:ख आणि वेदनेने व्यथित झालेल्या मित्रांना आवाहन करतो की, त्यांनी हा कडू घोट गिळून टाकावा."(३०)

# संदर्भसूची


१. Bishop Ruginald Heber, Quoted in David Hanidman Pesewat Nationalists of Gujarat, Oxford, New Delhi - 1989, p. 36.

२. रफिक झकेरिया, सरदार पटेल आणि भारतीय मुसलमान, (अनुवाद एकनाथ बागुल), विद्या प्रकाशन पुणे, १९९८, पृष्ठ क्र. ८.

३. M. N. Das, Partition and Independence of India, Vision Books, 1982, p. 62.

४. Parikh Narhari, Sardar Patel , Pl. Navjeevan Prakashan Mandir, Ahmedabad, p. 281.

५. Jayshree D. S., The Zronman of India, K. P. Bookwala and Co. New Delhi p. 104

६. Ibid. p. 104

७. V. Shankar, Sardar Patel's selected correspondence, Part – II, Navjeevan Prakashan, Ahmedabad, 1978.

८. Azad Maulana Abul Kalam, India Wins Freedom, Opcit.

९. M. N. Das, Partitition and Independence of India, Vision Books, New Delhi, 1970.

१०. Azad Maulana Abul Kalam : India Wins Freedom.

११. Das M. N., Partition and Independence of India, Vision Books, Delhi, 1982, p. 109.

१२. Sardar Patel's selected letters, V. Shankar, Opcit, p. 385.

१३. Ibid.

१४. Ibid, P. 389.

१५. Durgadas, Sardar Patels correspondence, Vol. II, Pg.

१६. Ibid.

१७. V. Shankar, Patel Correspondence, Opcit, P. 390.

१८. Patel Manibahen, Sardar's letters Mostly unknown Vallabhai Patel Smarak Bhavan, Ahmedabad, 1975, p. 385.

१९. Ibid. p. 182.

२०. रफिक झकेरिया, सरदार पटेल आणि भारतीय मुसलमान, (अनुवाद एकनाथ बागुल, विद्या प्रकाशन पुणे, १९९८, पृ. ७३.

२१. Rajibhai Patel, Hind Ke Sardar, Navjeevan Prakashan Mandir, Ahmedabad, 1972, p. 33.

२२. Vishnu Prabhakar, Sardar Vallabhai Patel, National Book Trust, New Delhi, 1982, p. 59.

२३. Govt. of India, Towards United India, speeches of Sardar Patel, Towards a United India Publication Division, New Delhi, 1949, p. 75.

२४. Ahluwalia B. K. Puts of Sardar Patel, Kalyanai Delhi, 1974, p. 183.

२५. U. P. Mishra, Living an Era, Vol. II, Vikas, New Delhi, 1978, p. 59.

२६. रफिक झकेरिया, सरदार पटेल आणि भारतीय मुसलमान, (अनुवाद एकनाथ बागुल, विद्या प्रकाशन पुणे, १९९८, पृ. ८६.

२७. Saggi P.D. – A Nation, Oh Man, Life and Works of Sardar Patel, Mumbai – 1951, p. 153.

२८. पूर्वोक्त... १५५.

२९. Sardar Vallabhai Patel, towards a United India, Pulication Division, Opcit, p. 10.

३०. Raojibhai Patel, Hind Ke Sardar, Opcit, p. 205.